**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९८५ दि. १४/०९/२०१९**

## उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## १५ कुंटुबियाचे तोडलेले पिण्याचे पाणी पोलीसांनी चालु करुन दिले

दिनांक १०/०९/२०१९ रोजी उत्तमनगर पोलीस ठाणे येथे उत्तमनगर भागातील १५ महिलांनी येवून कळविले की, त्यांचे रहाते १५ फ्लॅटचे पिण्याचे पाणी सोसायटीतील काही लोकांनी तोडलेले आहे व मागील ०४ दिवसापासुन आम्हास पिण्याचे पाणी नाही. ही माहीती मिळताच ठाणे अंमलदार पुनाजी किरवे यांनी गैरअर्जदार यांना बोलावून घेतले व काय प्रकार आहे याची चौकशी केली असता पिण्याचे पाण्याची पाईपलाईन ही दुरुस्तीकरीचे कामाकरीता तोडली असुन काम सुरु आहे मात्र गणपती सुरु असल्याने प्लँबर हा कामावर आलाच नाही व तो फोन उचलत नाही असे सांगीतल्याने पो हवा किरवे यांनी पोलीस ठाणेचे फोनवरुन प्लँबर यास पोलीस ठाणेत बोलावून घेवून त्यांना फ्लॅट धारकांना पिण्याचे पाण्याची झालेली गैरसोस समजावून सांगीतली व तात्काळ काम करुन त्यांना पिण्याचे पाण्याची पाईपलाईन सुरु करावी असे सांगीतले असता प्लँबरने काम करुन १५ फ्लॅट धारकांना पिण्याचे पाणी सुरु करुन दिलेले आहे. पाणी सुरु झाल्यामुळे १५ प्लॅटधारकांनी विशेषता महिलांनी पोलीसांचे आभार मानले आहेत. पो हवा पुनाजी किरवे यांनी सामाजीक भान व जबाबदारी समजुन जिवनावश्यक गरज असलेले पाणी सुरु करुन दिल्यामुळे नागरीकांनी पोलीसांचे आभार मानले आहेत. पो हवा किरवे यांचे या कामगीरीमुळे पोलींसांची जनमानसातील प्रतिमा उंचावली आहे.